66

महाराष्ट्र शासन

जा.क्र.टिपीएस-१८१६/१७७६/प्र.क्र.२५/१७/नवि-१३
नगर विकास विभाग, मुख्य इमारत
चौथा मजला, मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक : ०८/०३/२०१७

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
मु.का., पुणे-१. आवक क्र.
टिपीव्ही-१/२/३/४/५/६/७
प्रशा-१/१अ/२/लेखा/अर्थसंकल्प
७३५
10 MAR 2017
प्रजा/उस्वार/संन्र/

प्रति,
मा. संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य , पुणे.

**विषय : प्रादेशिक योजना, पुणे.**

महाराष्ट्रातील मंजूर विकास योजना / प्रादेशिक योजना करीता मंजूर करण्यात आलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व नियमावलीतील नियम क्र.१२.६ बाबत मार्गदर्शन...

संदर्भ:- आपले दि.१६/१२/२०१६ रोजीचे पत्र क्र.६७१३.

महोदय,

संदर्भित पत्रान्वये मौजे मंचर ता.आंबेगांव येथील स.नं. ४८ व ४९ मधील प्रस्तावासंदर्भात पूर्वबांधिलकी व "ड" वर्ग महानगरपालिकेसाठी नियमात केलेली तरतूद विचारात घेऊन, उक्त भूखंडामध्ये १५.० मी. पेक्षा जास्त उंचीच्या इमारती किमान १२ मी. रुंद रस्त्याचे बंधन न घालता अनुज्ञेय करण्याची धारणा व्यक्त करुन ती कायम करण्याबाबतची विनंती शासनास करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी नियम क्र.१२.६(अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विशेष इमारतीचे बांधकाम करतांना उक्त भूखंड किंवा इमारत १२ मी. रस्त्यावर आवश्यक आहे किंवा कसे याबाबत स्पष्टिकरण करण्याची बाब आहे. राज्यातील मंजूर प्रादेशिक योजनांसाठीची प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील *उपरोक्त नियमात इमारत कमीत कमी १२ मी. रुंद रस्त्यासन्मुख असावी असा जरी उल्लेख असला तरी नियम क्र.१२.३.१ चे अवलोकन करता, कमीत कमी १२ मी. रुंद रस्त्यावर विशेष इमारती असलेला भूखंड सन्मुख असणे अभिप्रेत आहे. एकाच भूखंडात एकापेक्षा जास्त विशेष इमारती असू शकतात.* **सबब, विशेष इमारतीचा भूखंड हा कमीतकमी १२.०० मी. रुंद रस्त्यावर असावा असा अर्थ काढणे योग्य होईल.**

मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील **नियम क्र.४४** अन्वये विनियमाचा अन्वयार्थ (Interpretation) लावण्याचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहेत. सबब संचालनालयाचे स्तरावरुन वरील प्रमाणे स्पष्टीकरण करण्याची कार्यवाही करावी. असे कळविणेचे मला आदेश आहेत.

आपला,

(रा.म.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

०/c


# नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

मध्यवर्ती कार्यालये, तळमजला, पुणे ४११ ००१

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६/२६१२९४९४

फॅक्स क्र.०२०-२६१२७०४१ E-mail : ddtpurc_pune@rediffmail.com


---

जा.क्र: लेखा/एसटीपी/टिपीव्ही-७/ ३६९९ दि. १२ /०७/२०१७

प्रति,

सहसंचालक, नगर रचना,
पुणे / कोकण / नाशिक / औरंगाबाद/
अमरावती / नागपूर विभाग

विषय :- **विकास योजना / प्रादेशिक योजना**
महाराष्ट्रातील मंजूर विकास योजना / प्रादेशिक योजना करीता मंजूर करण्यात आलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व नियमावलीतील नियम क्र.१२.६ बाबत मार्गदर्शन...

संदर्भ :- १) मुख्य कार्यालयाचे दि.१६.१२.२०१६ रोजीचे पत्र क्र.६७१३.
२) शासनाचे पत्र क्र. टिपीएस-१८१६/१७७६/प्र.क्र.२५/१७/नवि-१३ दि.०८.०३.२०१७.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील मंजूर विकास योजना / प्रादेशिक योजना क्षेत्रासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली दि.२१.११.२०१३ रोजी अधिसूचना क्र.टिपीएस-१८१२/१५७/प्र.क्र. ७१/१२/ पुनर्बांधणी क्र.३४/१२/नवि-१३ अन्वये मंजूर केली असून ती दि.२१.११.२०१३ पासून अंमलात आली आहे. मंजूर केलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील काही तरतूदी संदर्भात संदिग्धता असल्याने या नियमावलीतील मंजूर प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता नियम क्र. ४४ व मंजूर विकास योजना क्षेत्राकरिता नियम क्र. ४६ नुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदत्त असलेल्या अधिकारान्वये सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये नमुद केल्यानुसार स्पष्टीकरण देण्यात येत आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

सूचना – वर प्रमाणे सर्व शाखा कार्यालय व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व नगरपरिषदा/प्राधिकरणे यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

12/7/17

(मसूदा मा. संचालकांनी मंजूर केला असे) ०/c (सुलेखा वैजापूरकर)
सहपत्र- वरीलप्रमाणे संचालक, नगर रचना
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

12/7/17

प्रत – मा. प्रधान सचिव (नवि १), मंत्रालय, मुंबई यांना महितीकरिता सविनय सादर.

प्रपत्र – अ

महाराष्ट्रातील मंजूर प्रादेशिक योजना / विकास योजनांकरीता मंजूर करण्यात आलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील नियम क्र.४४ व नियम क्र.४६ नुसार स्पष्टीकरण

| विकास योजना विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली | प्रादेशिक योजना विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली | विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील नियम | विकास योजना / प्रादेशिक योजनेकरीता मंजूर करण्यात आलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील नियम क्र.४४ व नियम क्र.४६ नुसार स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| १२.६ | १२.६ | For building identified in Regulation No. 6.2.6.1, the following additional provisions of means of access shall be ensured;<br>(a) The width of the main street on which the building abuts shall not be less than 12 m. and one end of this street shall join another street of width not less than 12 m. in width subject to Regulation No.12.3.<br>(b) The approach to the building and open spaces on its all sides (see Regulation No. 15.1 shall be 6 m. and the layout for the same shall be approved in consultation with the Fire Officer, Fire Brigade Authority and the same shall be of hard surface capable of taking the weight of fire engine, weighing up to 45 tones. The said open space shall be kept free of obstructions and shall be motor able.<br>(c) Main entrances to the plot shall be of adequate width | राज्यातील मंजूर प्रादेशिक योजनांसाठीची प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील उपरोक्त नियमात इमारत कमीत कमी १२ मी. रुंद रस्त्यासन्मुख असावी असा जरी उल्लेख असला तरी नियम क्र.१२.३.१ चे अवलोकन करता, कमीत कमी १२ मी. रुंद रस्त्यावर विशेष इमारती असलेला भूखंड सन्मुख असणे अभिप्रेत आहे. एकाच भूखंडात एका पेक्षा जास्त विशेष इमारती असू शकतात. सबब, विशेष इमारतीचा भूखंड हा कमीत कमी १२ मी. रुंद रस्त्यावर स्थित असावा असा अर्थ अभिप्रेत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | to allow easy access to the fire engine and in no case it shall measure less than 4.5 m. The entrance gate shall fold back against the compound wall of the premises, thus leaving the exterior access way within the plot free for movement of fire engine / fire service vehicles. If main entrance at boundary wall is built over, the minimum clearance shall be 4.5 m. | |

12/7/17

(सुलेखा वैजापूरकर)

संचालक, नगर रचना

o/c महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता